REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631 (UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# भगतसिंगांचे धार्मिक विचार व त्याची प्रासंगिकता

डॉ. सुहास रंगनाथ मोराळे[१] , गीता शंकर गाडेकर[२]
[१]विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग , स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड .
माजी संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
[२](पीएच.डी संशोधक विद्यार्थी) , डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद .

## प्रस्तावना :


भारत हा धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य देश असुनसुध्दा राजकारणात सांप्रदायिकता वाढत आहे. राजकारणाचे असे नकारार्थी स्वरूप निर्माण होत असुन ते संपविण्यासाठी भगतसिंगांच्या धार्मिक विचारांची गरज आजही भारताला आवश्यक वाटते.

धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा पुरस्कार करूनही भारतात पुन्हा एकदा धर्मसत्ता आनण्याचा प्रयत्न होत असून. हिंदु – मुस्लिम यांच्या वादात देशाचा सर्वहारा वर्ग भरडला जात आहे.भारत देश हा बहुधर्मीय असून कुठल्याही धर्माला श्रेष्ठ – कनिष्ठदर्जा न देता धर्मनिरपेक्ष या तत्वाचा स्विकार केला. मात्र आज भारताची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. एका धर्माचे अनुयायी दुसऱ्या धर्माचे कट्टर शत्रु आहेत. आता तर एका धर्माचा असणे हे दुसऱ्या धर्माचा कट्टर शत्रु असल्यासारखे आहे. राष्ट्रीय व प्रांतिक राजकारण देखील आज जात व धर्माधारित होतांना दिसते. परिणामी समाजात सांप्रदायीक रोष वाहुन समाज विखुरलेल्या अवस्थेत दिसतो. म्हणूनच या समाजाला योग्य दिशा देण्याकरिता महान तत्वज्ञानाची व विचारांची गरज आहे. याबाबत स्वातंत्र्य लढयात स्वतःच्या प्राणाची आहुती देणाऱ्या शहीद भगतसिंगांच्या विचारांची प्रासंगिकता आजच्या परिस्थितीत महत्त्वाची ठरते.

## भगतसिंगांच्या धार्मीक विचारांची प्रासंगिकता :

जुन १९२८ मधील'किर्ती' च्या अंकात 'जातीय दंगली आणि त्यावरील उपाय' या लेखात भगतसिंगांनी लिहिलेले विचार आज ८८ वर्षानंतर देखील किती कालसुसंगत वाटतात. यावरूनच भगतसिंगाच्या जाती, धर्म व सांप्रदाय यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोण कसा होता हे लक्षात येते, म्हणूनच त्यांच्या विचारांची प्रासंगिकता समजून घेणे महत्वाचे ठरते. भगतसिंगांना फाशी झाली तेव्हा ते अवघ्या २३ वर्षाचे होते. एवढया कमी वयात प्रचंड वाचणाच्या जोरावर भगतसिंगांनी अनेक अवघड, क्लिष्ट आणि गंभीर विषयाबद्दल ज्ञान ग्रहन केले होते. आपल्या देशातील समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था आणि अर्थकारण या सर्वच गोष्टीच्या मुळाशी धर्म ही संज्ञा जोडली गेलेली दिसते, असे आढळल्यावर भगतसिंगांनी देखील धर्माबद्दलची आपली मते आणि आणि अभ्यास प्रचंड वाढवला होता.

धर्माची स्थापना ही मुळात लोकांना त्यांच्या मुलभूत अधिकारापासुन दुर ठेवण्यासाठी करण्यात आली. सर्वहरा वर्गातील लोकांना जर त्यांच्या शोषणांची जाणीव होऊ द्यायची नसेल आणि त्यांच्यातील




बंडाची ताकत नियंत्रित ठेवायची असेल तर 'धर्म' नावाची अफुची गोळी त्यांना चारून गुंगीत ठेवावे लागते. या मुळ प्रेरनेतुन धर्माचा प्रचार करण्यात आला आणि लोकांना सोयीस्करपणे मुर्ख बनवण्यात आले. या सर्व गोष्टी लक्षात घेवुन मार्क्सवादी धर्मचिकीत्सेचा अभ्यास करून भगतासिंगांनी में १९२८ च्या 'किर्ती'या अंकात 'धर्म आणि आमचा स्वातंत्र्यलढा' हा लेख लिहिला. ते पुढे स्वातंत्र्याविषयी बोलतांना म्हणतात.इंग्रजाच्या पकडीतुन सुटका करूण घेणे एवढाच आपल्या स्वातंत्र्याचा अर्थ नाही, जेव्हा लोक आपआपसात मिळून मिसळून

राहतील आणि बौध्दिक गुलामगीरीतून मुक्त होतील ते संपुर्ण स्वातंत्र्याचे नाव आहे,असे मत त्यांनी या लेखात मांडले.भगतसिंगांना धार्मिक आणि जातीय राजकारणाचे संभाव्य धोके ज्ञात होते म्हणूनच नौजवान भारत सभेच्या माध्यमातून त्यांनी हिंदू—मुस्लिम ऐक्याचा संदेश तरूणांमध्ये दिला. राज्यकर्ते म्हणजेच सत्ताधारी वर्ग हे नेहमीच आपली सत्ता टिकवून ठेवण्यासाठी जनतेमध्ये धार्मिक आणि जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतात.भगतसिंग सांप्रदायिकता पसरविण्यामध्ये वृत्तपत्राची भूमिका सांगताणा म्हणतात, ज्याप्रमाणे राजकारणी नेते जातीय दंगली घडवून आणण्यास कारणीभूत आहेत, अगदी त्याप्रमाणेच वृत्तपत्रवाले देखील अशा दंगलींना भडकवण्याचे काम करतात.नैतिक शिक्षण देणे, लोकांना फुटिरतेपासुन बाहेर काढणे, जातीयवादी भावना हद्दपार करणे, परस्परांमध्ये सलोखा निर्माण करणे हे वृत्तपत्रांचे खरेखुरे कर्तव्य आहे, पण अज्ञानाचा प्रसार करणे, पुढिरतेचा प्रसार करणे, जातीयवादी बनवने, लढाई, भांडणे करायला लावणे आणि भारतातील राष्ट्रीय सलोखा नष्ट करणे हेचत्यांनी आपले मुख्य कर्तव्य बनवले आहे. भगतसिंगांनी पत्रकारीता आणि प्रसार माध्यमांवर केलेली वरील टिप्पणी आपल्या मिडीयाला हबेहुब लागु पडते कारण पत्रकारिता हे माध्यम कुठल्या पातळीवर जाऊन काम करताहेत हे आपण रोज पाहतो.

धार्मिक व जातीय दंगलीची कारणे शोधतांना भगतसिंग म्हणतात 'जातीय दंगलीची मुळे जर आपण शोधु लागलो तर त्याचे कारण आर्थिक आहे,कारणभारताची आर्थिक परिस्थिती इतकी वाईट आहे की, आजही लोकाना येथे पोट भरून जेवायला मिळत नाही मग अशाउपासमारी व दुःखाने व्याकुळ झालेला माणुस सगळे तत्वज्ञान गुंडाळुन टाकतो. भगतसिंगांनी त्याकाळी मांडलेले विचार आजच्या परिस्थितीला जसेच्या तसे लागु होतात, कारण आज आपण भारतात प्रचंड प्रमाणात वाढलेली आर्थिक विषमता पाहतो आणि या आर्थिक विषमतेतुनच कुपोषण, रोगराई यापासुन ते जातीय आणि धार्मिक विद्वेषापर्यतचे प्रश्न आज देशासमोर निर्माण झाले आहे. सर्वहारा वर्ग उदा. शेतकरी, कामगार यांच्यात जोपर्यंत वर्गीय जाणिवा निर्माण होणार नाही तोपर्यंत ते धार्मिक द्वेषाच्या भावनेपासुन दुर होऊ शकत नाही.

भगतसिंगांच्या स्वप्नातील 'मानवता' या एकाच धर्मावर आधारलेली समाजवादी भारतीय समाजरचना निर्माण करायची असेल आणि जाती—धर्माच्या आधारे होणाऱ्या कत्तली थांबवायच्या असतील तर भगत सिंगांनी सांगितलेल्या 'इन्क्लाब' अर्थात क्रांतीनाऱ्याला सर्वसामान्य जनतेपर्यंत घेऊन जावे लागेल. धर्म समाजावुन सांगण्याऐवजी त्यांच्या समस्या आणि त्या समस्यांना कारणीभूत असलेले घटक ओळखायला शिकवावे लागेल तेव्हाच खऱ्या अर्थाने भारतात सामाजिक सलोखा निर्माण होऊन लोक स्वाभिमानाने आयुष्य जगतील. धर्माधपणामुळे मानसातील संकुचीतपणा वाढत चालला आहे. धर्म हा क्रांतीतील मोठा अडथळा असुन तो घरापुरता जरी मर्यादीत ठेवला तरी त्याने भेदभाव वाढेल.क्रांतीकारक हे धर्माला बुध्दीची गुलामगीरी मानत होते, धर्म हा माणसाचे वेळोवळी खच्चीकरण करतो. सर्व लोक एक व्हावे असे भगतसिंगांना वाटायचे पण त्यात श्रेष्ठ—कनिष्ठ, स्पृश्य—अस्पृश्य असे विभाजन त्यांना मान्य नव्हते. परंतु धर्म हा या भेदभावाला अधिक खत—पाणी घालतो.

अनेक धर्माच्या वेगवेगळया अनिष्ठ प्रथा होत्या त्या प्रथांविषयी कोणी बोलु शकत नसेल तर त्यांनी आपल्या घरात चुपचाप बसावे, इस्लामावर विश्वास न ठेवणाऱ्याला मृत्युदंड द्यायला हवा असा धर्म सांगतो. त्यापेक्षा आपण ऐक्याची घोषणा केली तर काय वाईट होणार आहे. ओढुन ताढुन धर्माच पठण करण्यापेक्षा यापासुन सुटकाकरून घ्यायला पाहिजे. भगतसिंग हे धर्माला स्वातंत्र्य लढयातील मोठा पहाढ समजत होते. काही म्हणतात कुराणातजे सागितले ते खरे आहे आणि काही म्हणतात,हिंदु धर्म ग्रंथात जे सांगितले ते खरे आहे. येथे तर आपल्या विचार करण्याच्या क्षमतेला रजा दिल्या सारखे वाटते. वेगवेगळया घटना, खाण्यापिण्यातील भेदभाव, स्पृश्य—अस्पृश्यता मुळापासुन उखाडून टाकल्या पाहिजे, जोपर्यत आपण आपल्या संकुचीत वृत्तीचा त्याग करत नाही. तोपर्यंत एक्य निर्माण होणार नाही. हे केले तरच आपला देश महासत्तेच्या दिशेने वाटचाल करेल त्यावेळी लोक आपआपसात मिळुन — मिसळून राहतील आणि बौध्दिक गुलामगीरीतुन मुक्त होतील तेव्हाच ते खऱ्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतील. असे त्यांना वाटत होते. परंतु आज पुन्हा एकदा भारताच्या राजकारणाचे चित्र बदलत आहे. भारताने धर्मानिरपेक्ष लोकशाहीचा पुरस्कार केला असला तरी धर्माचे पुनरूज्जीवन देखिल गतिमान होत आहे. म्हणूनच स्वातंत्र्यानंतर

संविधानाने दिलेल्या, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मुंल्य संपुष्ठात येत आहेत. अशा परिस्थितीत भगतसिंगांचे विचार प्रासंगिक वाटु लागतात.

आपल्या देशासारखी बिकट परिस्थिती आज कोणत्याचदेशाची नाही. धर्माच्या नावावर येथे दंगली होतात, धर्माच्या आधारावर निवडणुकांमध्ये मते मिळवतात. कोणत्या एका धर्माचे अथवा जातीचे होणे दुसऱ्या धर्मा अथवा जातीसाठी शत्रुत्व निर्माण करणे आहे. भारतात आजही पुर्णपणे उच्च व निच्च असा भेद संपलेला नाही. व्यक्ती बाहेरून तर मोठया—मोठया गोष्टीचा पुल बांधतो परंतु त्याच्या मनात आजही निच्च जातीच्याप्रति घृणा, द्वेष घर करून बसला आहे.

भारतात आजही धर्माच्या नावावर संघर्ष घडत आहेत. २००२ मध्ये गोध्रा हत्याकांड गुजरातमध्ये झाला. तर महाराष्ट्रात खैरलांजी हत्याकांड झाले. हे चीत्र असे स्पष्ट करते की, आजही जाती आणि धर्म मानवतावादी म्हणल्या जाणाऱ्या व्यक्तीच्या रक्तात पळत आहे. याला थांबवने आपले कर्तव्य आहे. धर्म आणि ईश्वरा संबंधी भगतसिंगाचे विचार खऱ्या अर्थाने आपली आवश्यकता बनली आहे ते म्हणतात, "आज सर्वत्र धर्मवाद आणि ईश्वरवादाने हाहाकार निर्माण केला आहे, या मानसिक स्थीतीतून समाजाल बाहेर काढण्यासाठी स्वत:ला परिवर्तनवादी, प्रगतीशील म्हणणारा या मानसीक स्थीतीतून बाहेर आला आहे का ? याचे आत्मपरीक्षण करणे जरूरी आहे. भारत हा बहुधर्मीय देश असुन त्यात विभिन्न धर्मामध्ये समन्वय नसेल तर समाजात शांती निर्माण होणे दुरापास्त होईल. भगतसिंग धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार करतांना दिसतात आणि ही धर्मनिरपेक्षता आमच्या संविधानात व्यक्त झाली आहे. शासनात धर्माचा कोणताही हस्तक्षेप असणार नाही, परंतु प्रत्येक नागरिकाला त्याच्या पसंतीच्या धर्माचे आचरण, प्रसार व प्रचार करता येईल वा कोणताच धर्म न पाळण्याचे स्वातंत्र्य नागरिकास असेल असे आपले संविधान सांगते.

## सारांश:

भगतसिंगांनी धर्मानिरंपेक्षतेचे स्वागत केले असले, तरी ते पुढे धर्महिनतेचा पुरस्कार करताना दिसतात. ते अध्यात्मवादी नव्हते, एक नास्तिक होते. धर्मनिरपेक्षतेचा स्विकार करूनही आज समाजाचे विघटन करणारे राजकारण जोराने सामोरे आनले जात आहे. धर्माच्या व गाईच्या नावे गोरखधंदे उघडले गेले आहेत. वास्तविक प्रश्नापासुनच्या विन्मुखतेसाठी धार्मिक प्रवचनांचे डोस पाजले जाते. स्वातंत्र्याला ७२ वर्षे उलटली असताना आजही धार्मिक उन्माद फैलावून समाजव्यवस्था बिघडवता येत असेल तर भगतसिंगांचा धर्महिनतेचा अर्थात धर्माला नाकारण्याचा विचार आजच्या तरूणांना प्रेरक होवु शकेल.

भगतसिंग म्हणतात की, धर्म व्यक्तिची व्यक्तीगत बाब आहे. यामध्ये दुसऱ्याचा हस्तक्षेप नको, त्याचप्रमाणे धर्म हा राजकारणात नको, कारण तो सगळंयाना एकत्र येवुन काम करण्यास अडथळा बनतो. यासाठीच 'गदर पार्टी' सारखे आंदोलन एकजुट आणि एकत्रीत राहीले. भगतसिंग एक क्रांतीकारक, लेखक, संपादक, विचारवंत आणि तत्वज्ञ होते, ते जर आज जीवंत असते तर कदाचीत भारत एका वेगळया अवस्थेत असता. भगतसिंगाच चिंतन आणि अभ्यास प्रंचड होता आणि त्याच आधारावर त्यांनी अनेक विषयावर लेखन केले आपले विचार मांडले जे की आजच्या परिस्थितीला प्रासंगिक ठरतात.

## संदर्भ सुची:

१. डॉ. ढवळे अशोक, भगतसिंह, एक मृत्युजंय क्रांतीकारक, जनशक्ती प्रकाशन
२. संपा. चमनलाल, भगतसिंह के राजनीतिक दस्ताऐवज, राष्ट्रीय पुस्तक न्याय भारत
३. भगतसिंह (ले.), पद्मा लक्ष्मी. (स.), भगतसिंह के विचार, नवभारत साहित्य
४. वेद स्वरूप नारंग, डॉ. ज्ञान कौरकपुर, शहीद भगतसिंह की जेलडायरी, राज पब्लिशिंग हाऊस जयपुर, प्रथम आवृत्ती २००२.